# कोल्हापूरची राणी जिजाबाईचे मराठयाच्या इतिहासातील योगदान

**प्रा. डॉ. व्ही.जी. वसु**
**इतिहास विभाग प्रमूख ,डॉ. एच.एन. सिन्हा महा.पातूर, जि. अकोला.**



**प्रस्तावना:-**

मराठयांनी जवळ जवळ २ शतके राज्य केले. या काळात अनेक कर्तबगार स्त्रिया, पुरूषांची परंपरा निर्माण झाली. राजमाता जीजाबाई, येशुबाई, ताराबाई, उमाबाई या कर्तबगार स्त्रियांच्या मालीकेत मराठेशाहीत आणखी एका स्त्रिचा समावेश करावा लागेल. ती कर्तबगार स्त्रि म्हणजे कोल्हापुरच्या छत्रपती संभाजी दुऱ्याची पत्नी जीजाबाई ही होय जीताबाईने आपल्या मुसद्‌देगीरीने, धैर्याने व बुध्दीमत्तेने कोल्हापूर घराण्याचा कारभार यशस्वी पणे सांभाळला एवढेच नव्हेतर आपल्या पतीपेक्षाही व सासु राजसबाईपेक्षाही आपल्या कर्तबगारीचा ठसा कोल्हापूरच्या प्रशासनावर निर्माण केला. अशा या राणी जीजाबाईच्या कार्किदीचे विवेचन प्रस्तुत लेखात केलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेच्या वेळी पराक्रम गाजविणारा सरदार जिवाजी शिंदे यांची जीजाबाई ही कन्याहोती. त्यामुळे लहानपणापासुनच राजकिय व लष्करी शिक्षण तिला मिळाले होते. ती अतिशय हुशार व महत्वाकांक्षी होती. इ.स. १७१८ ला तिचा विवाह राजाराम व रासबाईचा पुत्र संभाजी दुसरा बरोबर झाला. जीजाबाई ही संभाजीची चौथी राणी होती. ("मराठयाच्या इतिहासातील कर्तबगार स्त्रिया" डॉ. सुलोचना पाटील) "छत्रपती कोल्हापूरका गौरवशाली इतिहास" या डॉ. सुलोचना जोशी व डॉ सुधाकर अमृतफळळे यांनी अनुवादीत केलेल्या ग्रंथात जीजाबाई संभाजीची तिसरी पत्नी होती. अशा उल्लेख आढळतो विविहानंतर तिचा छत्रपतीच्या घराण्यात प्रवेश झाला आणि तिच्या कर्तबगारीला संभाजीच्या नेतृत्वाखाली अनुकुल संधी प्राप्त झाली.

कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याची स्थापना महाराणी ताराबाई हिने केली होती. परंतू १७१४ मध्ये ताराबाईची सवत राजसबाईने राज्यक्रांती करून कोल्हापुरची गादी बळकावली. अशा रितीने कोल्हापुरच्या राज्यकारभार राजसबाई व तिचा मुलगा संभाजी दुसरा यांचेकडे आला संभाजी हा छत्रपती असलातरी प्रशासना संबंधीचे काही निर्णय जीजाबाई घेत होती. कोल्हापुरच्या जीजाबाईकडे १७४० पासुनच राज्यकारभाराची सुत्रे आली असल्याचे संभाजीने सदाशिवराव भाऊस लिहलेल्या पत्रा वरून दिसते. छत्रपती शाहू सोबत कोल्हापूर राज्याच्या अंतर्गत प्रशासनाकडे विशेष लक्ष दिले होते असे दिसते. शाहूच्या मृत्यूनंतर मात्र कोल्हापुर व सातारा घराण्यातील संघर्ष कायमचा थांबला. परंतु मराठेशाहीत छत्रपती शाहू नंतर पेशव्यांचा प्रभाव वाढू लागला. अशा स्थितीत कोल्हापुर गादीचा स्वतंत्र दर्जा टिकविण्यासाठी जीजाबाईने नानासाहेबांशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू केले. व त्यांच्या कडुन कोल्हापूरचे राज्य सुरक्षीत ठेवण्याचे वचन घेतले. जीजाबाईने पेशव्याशी सलोख्याचे संबंध निर्माण केले असले तरी जीजाबाईची राजकीय भूमिका ही फक्त कोल्हापुर राज्याला अनुकुल होती. अशा प्रकारे छत्रपती संभाजीच्या मृत्यूपर्यंत कोल्हापूर घराण्याचे व पेशव्याचे संबंध मैत्रीपूर्ण असल्याचे दिसते.

२० डिसें. १७६० ला छत्रपती संभीजी दुसरा याचा मृत्यू झाला व त्यानंतर जीजाबाईने संभाजीची समाधी बांधली व जीजाबाईने शंभू छत्रपतीच्या समाधीवर ब्राह्मणांकडुन सक्तीने रूद्राभिषेक करविले किंवा शंकराचार्य नको म्हणत असतांनाही त्या समाघीच्या आवारात ब्राह्मण भोजन करविली असे मत "मराठी रियासत खंड ४" मध्ये सरदेसाईंनी व्यक्त केले आहे छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर राणी जीजाबाईच्या कर्तबगारीला पूर्ण वाव मिळाला. मृत्यू प्रसंगी संभाजीला कोणतेही अपत्य नव्हते. त्याच्या एकंदर सात राण्या होत्या. त्यात आनंदाबाई, उमाबाई, जीजाबाई, सुंदराबाई, सकवाबाई, दुर्गाबाई, कुसाबाई हया होय. संभाजीच्या मृत्यू प्रसंगी कुसाबाई ही राणी गर्भवती होती. परंतु नानासाहेब पेशव्यांनी महादजी भोसले (मुंगीकर) यांचे भाऊ डमाजी भोसले याला जीजाबाईने दत्तक घ्यावे असा आग्रह धरला. परंतु जीजाबाईने कुसाबाईला मुलगा होईल म्हणुन प्रतिक्षा करणे पसंत केले. त्यामुळे पेशवे व जीजाबाई यांच्या संबंधात कटुता निर्माण झाली. २५ मे १७६१ ला कुसाबाईला मुलगा न होता मुलगी झाली. परंतु यावेळी जीजाबाईने अनुबाई घोरपडे व इतर सरदारांना पत्र पाठवुन असे कळविले की, कुसाबाई २५ मे १७६१ रोजी प्रसुत होवुन पुत्र झाला. परंतु पुत्र झाला ही गोष्ट खरी नसुन कुसाबाईल मुलगी झाली होती. त्या मुलीची अदलाबदल करून पुत्र झाल्याचा खोटा पुरावा जीजाबाईने सादर केला होता. शेवटी माधवराव पेशव्या समोर जीजाबाईने या खोटया प्रकाराची कबुली दिली. असे मत "मराठी रियासत खं ४" मध्ये सरदेसाईंनी व्यक्त केले आहे.

या घटनेनंतर कोल्हापुर राज्यासाठी दत्तक घेण्याची परवानगी मिळविण्यासाठी जीजाबाईने २७ एप्रिल १७६२ ला माधवराव पेशव्याची जेजुरीस भेट घेतली. व माधवराव पेशव्याच्या संमतीने २२ सप्टेंबर १७६२ ला शहाजी भोसले खानवटकर यांचे पुत्र मानकाजीचे शिवाजी असे नामकरण करून त्याचा २७ सप्टेबर १७६२ ला राज्याभिषेक करण्यात आला. २६ मार्च १७६३ ला शिवाजीचा उपनयन संस्कार करण्यात आला.

शिवाजी अल्पवयीन असल्यामुळे कोल्हापुर घराण्याचा सर्व कारभार जीजाबाईने जवळ जवळ १२ वर्ष सांभाळला. दत्तक विधानाच्या वेळी जीजाबाईने आपल्या सरदारांकडुन आपल्यासी एकनिष्ठ राहण्याची इमान पत्रे लिहून घेतली होती. अबाजी कृष्ण प्रतिनिधी, भगवंतराव प्रतिनिधी, हनमंतराव मानकेश्वर व इतर सरदारांची इमान पत्रे "करविर रियासत" व "कोल्हापुर प्रांताचा अर्वाचिन इतिहास" या ग्रंथात उपलब्ध आहे. एवढेच नव्हे तर १७६३ मध्ये आपल्याशी बंडखोरी करणाऱ्या सरदाराचा पेशव्यांनी बंदोबस्त करावा असा करार जीजाबाईने माधवरावांन सोबत गेला होता. अशाप्रकारे जीजाबाईने अल्पवयीन शिवाजीच्या नावाने राज्यकारभार करित असतांना कोल्हापुर राज्यावर आपली संपुर्ण पकड निर्माण केली होती.

१७६५ मध्ये माधवराव पेशव्याची कर्नाटक मोहिम सुरू असतांना इंग्रजांनी कोल्हापुरच्या छत्रपतीच्या ताब्यातील सिंधुदूर्ग किल्ल्यावर आक्रमण केले. या प्रसंगी जीजाबाईने इंग्रजांबरोबर लढण्याची सिध्दता केली व माधवरावांना मदत मागितली. परंतु कर्नाटक स्वारीत गुंतले असल्यामुळे माधवरावांनी जीजाबाईला मदत केली नाही. अशा स्थितीत १२ जाने. १७६६ ला जीजाबाईने इंग्रजांशी करार करून सिंधुदूर्ग किल्ला परत मिळविला. परंतु त्या मोबदल्यात जीजाबाईला सात लक्ष रूपये इंग्रजांना दयावे लागले. त्याच बरोबर जीजाबाईने आपल्या मृत्यूनंतरही कोल्हापुर राज्याच्या संरक्षणाची हमी इंग्रजांकडून लेखी स्वरूपात मिळवून घेतली होती. हे तिच्या मुत्सद्देगिरीचे उत्कृष्ट उदाहरण होय.

अशा प्रकारे राणी जीजाबाई ही मराठेशाहीतील अत्यंत शिस्तप्रीय, कर्तबगार, कुशल प्रशासक व पराक्रमी महाराणी होती. असे दिसुन येते. तिच्या कर्तबगारीचा दरारा संपुर्ण दक्षिण महाराष्ट्रात होता. प्रत्यक्ष रणांगणांवरील युध्दातही ती सहभागी होत असे. नानासाहेब पेशवे व माधवराव पेशव्याच्या काळातील सर्व प्रकारच्या राजकीय डावपेचांचा तिने यशस्वीपणे सामना केला. त्याच बरोबर अनेकदा जीजाबाईने आपल्या मुत्सद्देगिरीची साक्ष पटवुन दिली. छत्रपती संभाजी दुसरा हा पराक्रमी नसलातरी राणी जीजाबाईने जे राजकारण कौशल्य दाखविले. त्यामूळेच कोल्हापूरचे राज्य अनेक आक्रमणे झ ाालेली असतांनाही टिकून राहिले.

जीजाबाईने केवळ राजकिय किंवा प्रशासकीय कार्य केले असे नाही तर जीजाबाईने आर्थिक व सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनिय कार्य केले आहे. वाडी रत्नागिरी येथील यमाई मंदीरासमोरील लोकोपयोगी तलाव, पंचगंगानदीच्या दक्षिण किनाऱ्यावरील बांधलेली संभाजीची समाधी, कोल्हापुरच्या महालक्ष्मी मंदिराची पूर्णरचना, तसेच अनेक साधुसंतांना व मंदीरांना दिलेले इनामे हे तिच्या धार्मिक व सामाजिक कार्याची साक्ष पटविते.

अशा राणी जीजाबाईचा १७ फेब्रुवारी १७७२ ला मृत्यू झाला. जीजाबाईने पराक्रम, साहस, कर्तबगारी, कुशलता, मुत्सद्दीपणा, आत्मविश्वास या बळावर कोल्हापुर राज्य शेवटपर्यंत सुरक्षीत ठेवले. हे तिचे मराठयांच्या इतिहासातील सर्वाधीक महत्वाचे योगदान आहे. त्यामुळे इतिहासकार सरदेसाईंनी व वासुदेव शास्त्री खरे यांनी जीजाबाईच्या कर्तव्य परायणतेची, धैर्यशिलपणाची व मुत्सद्देगिरीची प्रशंसा केली आहे.

### संदर्भ ग्रंथ सूची :-

(१) करविर रियासत - गार्गे स.मा.
(२) छत्रपती कोल्हापुरका गौरवशाली इतिहास - जोशी डॉ. सुलोचना, अमृतफळे डॉ. सुधाकर
(३) करविर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने भाग १ - गुजर मा.वि.
(४) मराठयांचा इतिहास खंड २, खंड ३ - कुलकर्णी डॉ. अ.रा., खरे डॉ. ग.ह.
(५) मराठी रियासत खंड ४ - सरदेसाई गो.से.
(६) मराठयाच्या इतिहासातील कर्तबगार स्त्रिया - पाटील डॉ. सौ. सुलोचना
(७) तह व करार मदार - पारसनीस मावजी
(८) अशी होती शिवशाही - कुलकर्णी अ.रा.
(९) महाराणी ताराबाई - पवार जयसिंगराव
(१०) मराठेशाहीचा मागोवा - पवार जयसिंगराव
(११) मराठो का नविन इतिहास खड ३ - सरदेसाई गो.स.